राज्यातील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम -२०२२ बाबत.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक-रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०५/का-६
नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १४ जुलै, २०२२.

प्रति,

जिल्हाधिकारी,
पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, धुळे, नंदुरबार,
जळगांव, अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर,
अमरावती व बुलढाणा.

विषय :-राज्यातील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०२२ बाबत.

संदर्भ: १) आयोगाचे क्रमांक रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०२/का-६, दि.०६/०५/२०२२ व दि. ०९/०६/२०२२ चे आदेश, (प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम)
२) आयोगाचे क्र. रानिआ/नप-२०२२/प्र.क्र.०३/का-६, दि.०६/०५/२०२२ व दि. ०९/०६/२०२२ च आदेश, (प्रभाग रचना, आरक्षण व सोडतीचा कार्यक्रम)
३) आयोगाचे समक्रमांकाचे दि.१०/०६/२०२२ चे आदेश. (मतदार यादी कार्यक्रम)
४) राज्य निवडणूक आयोगाचा समक्रमांकाचा दि. ०८/०७/२०२२ चा प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०२२
५) मा. सर्वोच्च न्यायालयात पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपील (सी) क्रमांक १९७५६/२०२१ मध्ये दि. १२/०७/२०२२ रोजी झालेली सुनावणी

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाचे दि. ०८ जुलै, २०२२ रोजीच्या पत्रान्वये १७ जिल्ह्यातील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींच्या सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०२२ दिला होता.

मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्रमांक १९७५६/२०२१ ची सुनावणी दि. १२ जुलै, २०२२ रोजी झाली. त्यावेळी शासनाने समर्पित आयोगाने नागरिकांच्या मागासप्रवर्गाबाबत दिलेला

अहवाल मा. सर्वोच्च न्यायालयात सादर केला. मा. सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भातील पुढील सुनावणी दि. १९/०७/२०२२ रोजी ठेवलेली आहे.

सदर पार्श्वभूमीच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आयोगाचे दि. ०८ जुलै, २०२२ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेला राज्यातील ९२ नगरपरिषदा व ४ नगरपंचायतींमधील सदस्य पदांच्या सार्वत्रिक निवडणूकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम-२०२२ याद्वारे स्थगित करण्यात येत आहे. सदर निवडणूकांसाठी सुधारित निवडणूक कार्यक्रम यथावकाश देण्यात येईल. या बाबीस आपल्या स्तरावरून योग्य ती प्रसिध्दी देण्यात यावी. निवडणूक कार्यक्रम स्थगित झाल्यामुळे वरील सर्व क्षेत्रात जाहीर करण्यात आलेली आचार संहिता आता लागू राहणार नाही.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

आपला

(संजय सावंत) 14.07.2022

अवर सचिव,

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ .
२. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ .
३. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
४. मुख्य निवडणूक अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ .
५. प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ .
६. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७. संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
८. प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन तथा विभागीय आयुक्त, पुणे, नाशिक, औरंगाबाद व अमरावती.
९. संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक.
१०. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.